MHWS07001737-2019

दाखल दिनांक : १४/०८/२०१८

नोंदणी दिनांक : १४/०८/२०१८

न्यायनिर्णय दिनांक : ०३/०७/२०२६

कालावधी : ०७वर्ष १०म. १९दि.

**भाग 'अ'**

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.३), कारंजा (लाड), जि. वाशिम यांचे न्यायालय</u>,**

(पिठासीन अधिकारी बी. ए. नेरलीकर)

**जुना संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १०६६/२०१८**

**नियमीत फौजदारी खटला क्र. १४५/२०१९** **निशाणी क्र. ४३**

| | | |
|---|---|---|
| | गु.र.क्र. ३०३१/२०१८, पोलीस ठाणे, कारंजा ग्रामीण. | |
| फिर्यादी/सरकार पक्षः | | **महाराष्ट्र शासन द्वारा**<br>कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन,<br>ता. कारंजा(लाड), जि. वाशिम. |
| सरकार पक्षातर्फे : | | श्री.आर.सी.चव्हाण विशेष सहाय्यक सरकारी वकील. |
| | | **१. कलंदर शहा दिलबर शहा,**<br>वय : ३८ वर्ष, व्यवसाय : मजुरी,<br>**२. हसिना ज. शहा कलंदर शहा,**<br>वय : १९ वर्ष, व्यवसाय : मजुरी,<br>**३. साबु शहा दिलबर शहा,**<br>वय : ५२ वर्ष, व्यवसाय : मजुरी,<br>**४. बशीर शहा शेरु शहा,**<br>वय : ६२ वर्ष, व्यवसाय : मजुरी,<br>सर्व रा. वाई, ता. कारंजा, जि. वाशिम |

| | | |
|---|---|---|
| आरोपी तर्फेः | | श्री. व्ही. एस. अटोर, श्री. डी. एस. देवळे वकील |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | २८/०४/२०१८ |
| पहिली खबर तारीख | ०५/०५/२०१८ |
| दोषारोपपत्राची तारीख | ०२/०८/२०१८ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २३/०७/२०१९ |
| पुराव्याला लागल्याची तारीख | २३/०७/२०१९ |
| न्यायनिर्णयास राखीव तारीख | -------- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०३/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | -------- |

आरोपीची माहिती

| आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हयाचे कलम | शिक्षेस पात्र किंवा निर्दोष | शिक्षाधिन बंदीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| कलंदर शहा दिलबर शहा | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटीस | १४/०८/ २०१८ | कलम ३३६, २९४, ५०४ व ५०६ भादंवि सह कलम ३४ | निर्दोष | -- |
| हसिना शहा कलंदर शहा | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटीस | १४/०८/ २०१८ | कलम ३३६, २९४, ५०४ व ५०६ भादंवि सह कलम ३४ | निर्दोष | |
| साबु शहा दिलबर | फौ.प्र.सं. | १४/०८/ | कलम ३३६, | निर्दोष | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| शहा | कलम ४१(१) नुसार नोटीस | २०१८ | २९४, ५०४ व ५०६ भादंवि सह कलम ३४ | | |
| बशीर शहा शेरु शहा | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटीस | १४/०८/ २०१८ | कलम ३३६, २९४, ५०४ व ५०६ भादंवि सह कलम ३४ | निर्दोष | |

## भाग 'क'

## साक्षीदारांची यादी

### अ. सरकारी साक्षीदारांची यादी

| अनु.क्र. | नाव | नि.क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१ | शामराव नामदेवराव खाडे | २६ | घटनास्थळ पंच |
| ०२ | साहेबराव खंडुजी ठाकरे | ३० | साक्षीदार |
| ०३ | गजानन गोविंदराव इंगोले | ३४ | तपास अधिकारी |

### अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | २७ | घटनास्थळ पंचनामा |
| ०२. | ३८ | घटनास्थळ पंचनामा |
| ०३. | ३९ | सा.क्र. २ चा अधोरेखांकित भाग 'अ' |
| ०४ | ४० व ४१ | प्रथम खबरी अहवाल व तक्रार वरील दाखल अधिकारी याची सही |

**बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक**

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे निशाणी क्रमांक**

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**भौतीक वस्तू**

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०३ जुलै, २०२६ ला घोषित)

१. सदरचे प्रकरण आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, ३३६, २९४,५०४, ५०६ सह कलम ३४ च्या गुन्ह्यासाठी न्यायचौकशीस आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२. दिनांक २८/०४/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजताचे दरम्यान फिर्यादी वाई येथील शेतातून नांगरणी करुन परत घरी आला असता व घरी थांबला असता सर्व आरोपी हे फिर्यादीच्या घरासमोर येउन लोखंडी दरवाजा वाजवून त्यांनी फिर्यादीला बाहेर बोलाविले. त्यामुळे फिर्यादी दरवाजा उघडून त्याच्या पत्नीसह बाहेर आला असता आरोपी कलंदरशहा, साबू वि. दिल्लू शहा यांनी फिर्यादीला म्हणाले कि, 'तुम्ही आमच्या शेजारी कशाला राहता, दुसरीकडून येउन येथे राहत आहात', असे म्हणून 'मादरचोद येथून निघून जा,' असे अश्लील भाषेत शिवीगाळ केली. तसेच आरोपी हसीना कलंदर शहा व बशीर शेरु शहा हे नेहमी

फिर्यादीच्या घरा समोरुन येता जाता त्याला शिवीगाळ करतात. वरील चारही आरोपींनी फिर्यादीला केलेली अश्लील शिवीगाळ हे अरविंद भगत व गजानन राउत यांनी ऐकल्या व त्यांना माहित आहेत. आरोपी हे फिर्यादी याने वाई येथील जमीन जुमला व घर विकून जावे म्हणुन त्यांना जिवाने मारण्याच्या नेहमी धमक्या देत होते व त्याला इजा होईल अशा पदध्तीने नेहमी त्याच्या घरावर दगड व दारुच्या रिकाम्या शिश्या फेकून मारत होते.

३. वरील आशयाच्या फिर्यादीवरून कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे अपराध क्र. ३०३१/२०१८ वरील कलमांन्वये नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासीक अंमलदार पो.हे.कॉ. गजानन इंगोले यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपींविरूध्द अंतिम अहवाल न्यायालयात सादर केला.

४. सदर खटल्यात आरोपी हजर झाल्यानंतर माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपींविरूध्द निशाणी क्र.२१ अन्वये दोषारोप निश्चीत केला व आरोपीस समजावून सांगितला असता त्यांनी निवेदन निशाणी क्र.२२ ते २५ प्रमाणे गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. त्यानुसार अभियोग पक्षाने साक्षीदार तपासले. साक्षीदाराच्या पुराव्यात आरोपींविरुध्द अभिलेखावर आक्षेपार्ह मजकूर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ (१) (ब) प्रमाणेचा जबाब नोंदविण्यात आले नाही.

५. संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. आर. सी. चव्हाण यांचा युक्तिवाद ऐकला आणि बचाव पक्षातर्फे आरोपींचे सुविद्य विधीज्ञ श्री. डी. एस. देवळे यांचा युक्तिवाद ऐकला. त्यानंतर या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उद्भवलेत. या प्रश्नांना मी त्याखालील नमुद कारणमिमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक २८/०४/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वाजताचे सुमारास ग्राम वाई येथे आरोपींनी फिर्यादीची व्यक्तीगत सुरक्षा | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | धोक्यात येईल इतक्या बेदकारपणे किंवा हयगयीने त्याच्या घरावर दगड व दारुच्या रिकाम्या शिश्या फेकल्या व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३३६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | |
| २ | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी 'मादरचोद' अशी अश्लील शिवीगाळ केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम २९४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| ३. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन त्याचा अपमान करुन त्याला प्रक्षिोीत केले अशा प्रक्षोभनामुळे त्याच्या कडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागचा हेतू होता व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| ४. | वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला रिपोर्ट दिल्यास धाकदपटश्या करुन जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला, हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नाही.** |
| ५. | काय आदेश? | **आरोपी निर्दोष मुक्त** |

## –: का र ण मि मां सा :–

**मुद्दे क्रमांक १ ते ४ बाबत:–**

६. वरील सर्व मुद्दे हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्यांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांची चर्चा एकत्रीतपणे करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षास हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादीची व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात येउन त्याच्या घरावर दगड व दारुच्या रिकाम्या

शिश्या फेकल्या, तसेच फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी 'मादरचोद', अशी इतरांना त्रास होईल अशाप्रकारे अश्लील भाषेत शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. यासाठी अभियोग पक्षाने अभिलेखावर आणलेल्या पुराव्याचे विस्तृत विवेचन करणे आवश्यक आहे.

८. सा. क्र.१ शामराव खाडे आपल्या साक्षीत असे कथन केले आहे की, दिनांक ०६/०५/२०१८ रोजी पोलीसांनी त्याला पंचनाम्या करीता बोलाविले नव्हते. पोलीसांनी त्याच्या समक्ष कोणताही पंचनामा केल नाही. तसेच त्याने घटनास्थळ पंचनामावर निशाणी क्र. २७ वर त्याची सही असल्याची बाब मान्य केली व त्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले. सा.क्र.२ साहेबराव ठाकरे याने त्याच्या पुराव्यात घटना अंदाजे एक वर्षापुर्वी त्याच्या घरासमोर घडली होती. पंरतु त्याला घटनेबाबत काही एक माहित नसल्याचे त्याने कथन केले. साक्षीदार क्र. १, २ हे अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे त्याचा उलटतपास नोंदविण्यात आला. परंतु अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान देखील सा.क्र. १ व २ यांनी अभियोग पक्षाच्या पृष्ट्यर्थ कोणतेही कथन केले नाही.

९. सा.क्र. ३ गजानन गोविंदराव इंगोले यांनी आपल्या साक्षीत असे कथन केले आहे की, तो आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. दिनांक ०५/०५/२०१८ रोजी तो कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कार्यरत होता. त्यादिवशी त्याच्याकडे गुन्हा क्र. ३०३१/२०१८ चा तपास सोपविण्यात आला. तपासकामी त्याला जबाणी रिपोर्ट, प्रथम खबरी अहवाल देण्यात आला. तपासादरम्यान त्याने घटनास्थळी जाउन दोन पंचा समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला. घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. ३८ वर त्याची व पंचांची सही असून त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले. त्याने फिर्यादी व साक्षीदार यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले व तपासाअंती न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. पुढे त्यांनी असे कथन केले कि, सा.क्र. २ साहेबराव ठाकरे यांचा जवाब त्यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता. तसेच त्यांनी प्रथम खबरी अहवाल व तक्रारीवरील पी. एस. आय सुरवसे यांची सही ओळखली. आरोपी तर्फे नोंदविण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे सदर साक्षीदाराने नकारत्मक दिली.

१०. एकंदरीत अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्ष पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१ व २ यांनी तिळमात्रही अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्याचे त्यांच्या पुराव्यातून दिसून येते. सदर प्रकरणात महत्वाचा साक्षीदार फिर्यादी हा मयत असल्याने त्याची साक्ष नोंदविता आली नाही व तो मयत असल्याबाबत पोलीसांनी नि.क्र. ३५ अनव्ये त्याचा मृत्युचा दाखला दाखल केला आहे. सदर प्रकरणातील फिर्यादीच्या फिर्याद प्रमाणे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार अरविंद भगत व गजानन राउत यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्या कारणाने त्यांची साक्ष नोंदविण्यात आली नसल्याचे दोषारोपपत्रातून दिसून येते. साक्षीदार क्र. ३ हे तपासी अधिकारी असून त्यांनी जरी घटनास्थळ पंचनामा नमुद पंचासमंक्ष तयार केल्याचे कथन केले असले तरी पंच साक्षीदार यांनी त्यांच्या समक्ष कुठलाही पंचनामा केला नसल्याचे कथन केले. त्यामुळे अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनामा संशयापलीकडे जाउन सिध्द केला हि बाब ग्राहय धरता येणार नाही. तसेच साक्षीदार क्र. ३ यांनी केवळ फिर्यादीच्या तक्रार व प्रथम खबरी अहवालावरील दाखल अधिकारी पी. एस. आय. सुरवसे यांची सही ओळखल्याचे कथन केले आहे. परंतू फिर्यादीच्या फिर्याद मधील मजकुर हा फिर्यादी मयत असल्या कारणाने सिध्द होउ शकला नाही. म्हणून अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीदारांचा साक्षीपुरावा पाहता आरोपींविरुध्द कोणताही सबळ व ठोस पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे भारतीय दंड संहिताचे कलम ३३६, २९४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वयचे कुठलेही घटक सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ बाबत:–</u>**

११. उपरोक्त कारणमिमांसेवरून हे स्पष्ट होते की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द ठेवलेला दोषारोप संशयापलीकडे जाऊन सिध्द केला नाही. त्यामुळे आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब मुद्दा क्रमांक ५ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## – आ दे श –

१. आरोपी क्र. १ कलंदर शहा दिबर शहा, आ.क्र. २. हसीना शहा कलंदर शहा, आ.क्र. ३ साबु शहा दिलबर शहा, आ.क्र. ४. बशीर शहा शेरु शहा यांची भारतीय दंड संहिताचे कलम ३३६, २९४, ५०४ व ५०६ सह कलम ३४ खाली शिक्षापात्र गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे पुर्वीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये पुर्तता करणेकामी त्यांचे जामीनपत्र व स्वबंधपत्र प्रत्येकी रूपये ५,०००/– द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)**

NERLIKAR BHUSHAN ANANDRAO

Digitally signed by NERLIKAR BHUSHAN ANANDRAO
Date: 2026.07.03 16:14:01 +0530

(**बी.ए. नेरलीकर**)

दिनांक: ०३/०७/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(कोर्ट क्र.३), कारंजा (लाड).

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | -------- |
| Court Name | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 03/07/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 03/07/2026 |
| Order uploaded on | :- | 03/07/2026 |